महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
छत्रपती संभाजीनगर विभागीय मंडळ, छत्रपती संभाजीनगर
Email: chair.aurboard@mahedu.gov.in/sschscboardabad@gmail.com
Tel: Div.Chairman(P) : (0240)-2331116 EPABX -2334228/2334284 Div. Secretary (P) :2341035

जा.क्र.छसंविमं/लेखा/६२६
दि.१५/५/२०२६

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य
सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविदयालये
छत्रपती संभाजीनगर,बीड,जालना,परभणी,हिंगोली.

विषय:- सन २०२५-२६ च्या अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे ३१ अंशतः बाधित व २५१ पूर्णतः बाधित तालुक्यातील इ.१० वी व इ.१२वी च्या विदयार्थ्यांना परीक्षा फी माफी/फी ची प्रतिपूर्ती कळविणेबाबत...

संदर्भ:- १.क्र.रामं/लेखा/अवर्षणग्रस्त फी माफी-प्रतिपूर्ती २५-२६/१६७९ दि.१७/०४/२०२६
२.क्र.रामं/लेखा/अवर्षणग्रस्त फी माफी-प्रतिपूर्ती २५-२६/२०६५ दि.१५/०५/२०२६

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार सन २०२५-२६ च्या अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे ३१ अंशतः बाधित व २५१ पूर्णतः बाधित तालुक्यातील इ.१० वी व इ.१२वी च्या या योजनेस पात्र असलेल्या, नियमित विदयार्थ्यांना आकारण्यात आलेल्या संपूर्ण परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करावयाची आहे.

राज्यमंडळाने माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२६ मधिल प्रविष्ठ झालेल्या नियमित विदयार्थ्यांच्या यादीसाठी मंडळाच्या संकेतस्थळावर शाळा महाविदयालयांनी आपल्या लॉगइन-पासवर्ड चा उपयोग करुन लॉगइन करावे. अतिवृष्टी व पूर आपत्तीग्रस्त विदयार्थ्यांची माहिती भरण्यासाठी ऑप्शन तेथे उपलब्ध होईल.राज्यमंडळाने उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमध्ये नियमित विदयार्थ्यांचा बैठक क्रमांक,विदयार्थ्यांचे नाव, बँक खाते क्रमांक, आएफएससी कोड, आधार क्रमांक अशी माहिती उपलब्ध करुन दिली आहे. सदर माहिती भरण्याकरिता **संदर्भ क्र.२ नुसार पुनःश्च दि.२०/०५/२०२६ ते दि.०५/०६/२०२६** हा कालावधी देण्यात येत आहे.

तरी सदर कालावधीत पात्र विदयार्थ्यांची माहिती भरुन निर्देशित केल्या प्रमाणे सादर करण्यात यावी.

विभागीय **सचिव**
**छत्रपती संभाजीनगर विभागीय मंडळ,**
**छत्रपती संभाजीनगर**

**प्रत माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तव**

शिक्षणाधिकारी माध्यमिक (छत्रपती संभाजीनगर,बीड,जालना,परभणी,हिंगोली) यांना कळविण्यात येते की, आपल्या अधिनस्त मुख्याध्यापक/प्राचार्य माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविदयालये यांना उपरोक्त बाबत आपल्या स्तरावरुन कळविण्याची कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

स.न.८३२ ए. सारथी कार्यालयाजवळ, फायनल प्लॉट
नं. १७८, १७९, आघारकर संशोधन संस्थेच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर, पुणे-४११००४.

Maharashtra State
Board of Secondary & Higher
Secondary Education, Pune

S.R.No.832-A, Near Sarthi Office, Final Plot No.178,179,
Behind Agharkar Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune- 411 004.

Phone No.020-25705000 • Email : secretary.stateboard@gmail.com

क्र. रा. मं./लेखा /अवर्षणग्रस्त फी माफी-प्रतिपूर्ती २५-२६/ 2065
राज्य मंडळ, पुणे ४११ ००४
दि. 15/05 /२०२6

प्रति,
विभागीय सचिव.
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय**:- अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे ३१ अंशतः बाधित व २५१ पूर्णतः बाधित तालुक्यातील इ. १० वी व इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी /फी ची प्रतिपूर्ती करण्याबाबत..

**संदर्भ** :- क्र. रा. मं./लेखा /अवर्षणग्रस्त फी माफी-प्रतिपूर्ती २५-२६/१६७९, राज्य मंडळ दि. १७/०४/२०२६.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे ३१ अंशतः बाधित व २५१ पूर्णतः बाधित तालुक्यातील इ. १० वी व इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांना फी माफी /फी ची प्रतिपूर्ती करण्याकरीता विद्यार्थ्यांची माहिती भरणेसाठी दि. २०/०४/२०२६ ते दि. ०२/०५/२०२६ पर्यंत लिंकवर माहिती भरणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार काही विद्यार्थ्यांची माहिती प्राप्त झाली आहे. तरी विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहू नये याकरीता पुनःश्च दि. २०/०५/२०२६ ते दि. ०५/०६/२०२६ या कालावधीत लिंक सुरु करण्यात येत आहे.

तरी सर्व विभागीय मंडळांनी आपल्या स्तरावरून आपल्या कार्यकक्षेतील शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना सदर कालावधीत माहिती भरणेबाबत त्वरित कळवावे.

Mali
(डॉ.दिपक माळी)
सचिव ,
राज्यमंडळ, पुणे -०४

प्रत माहितीस्तव तथा तातडीच्या पुढील कार्यवाहीसाठी :-

५. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन ,मंत्रालय, मुंबई ३२.
६. मा.आयुक्त (शिक्षण ), शिक्षण आयुक्तालय महाराष्ट्र राज्य , मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.
७. श्रीम. पल्लवी बच्छाव , कक्ष अधिकारी (SD-5), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.
८. मा.शिक्षण संचालक (योजना ), मध्यवर्ती इमारत , पुणे ४११ ००१.

प्रत माहितीस्तव तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव :-

३. विभागीय शिक्षण उपसंचालक - पुणे/नागपूर/छ.संभाजीनगर /अमरावती/नाशिक/लातूर/कोल्हापूर /बृहन्मुंबई
४. शिक्षणाधिकारी (माध्यमिक ),सर्व जिल्हे

यांना कळविण्यात येते की, मंडळाच्या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांची माहिती तात्काळ भरणेबाबत शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना आपल्या स्तरावरून सूचित करण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विभागीय मंडळांना सादर करावा.